# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२२-२३/शिष्यवृत्ती शाखा/(२३९९/२३)/ ८०३ दिनांक : ३१.०३.२०२३

**तात्काळ / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२२-२३/डीबीटी/३९१४ दि. २८.०३.२०२३.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जांची पडताळणी महाविद्यालय स्तरावरुन करणेबाबत वेळोवेळी परिपत्रकाद्वारे तसेच सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वॅाट्सॅप वर जिल्हानिहाय गृपमध्ये वारंवार सूचनाद्वारे कळविण्यात येत आहे. तरीही दि. २८.०३.२०२३ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार पुणे विभागांतर्गत महाविद्यालय, विद्यापीठ व संस्था स्तरावर सन २०१९-२०, सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मधील खालीलप्रमाणे पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| १ | पुणे | १०५ | २४१ | ५७३३ | २४७ | ५९२ | १६१७ | ३१२७ |

**महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. सदर दुसऱ्या हप्त्याच्या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना वेळेवर जमा होण्याकरिता महाविद्यालयाने सुध्दा सदर सेकंड ईन्स्टॉलमेंटसाठी प्रलंबित असलेली सर्वच्या सर्व स्कृटिनी वेळेत करणे क्रमप्राप्त आहे. तसेच अनेक महाविद्यालय स्तरावर सन २०२०-२१, सन २०२१-२२ करिता १-१, २-२, ३-३, ५-५, १०-१०, ऑनलाईन ॲप्लिकेशन स्कृटिनी अभावी प्रलंबित आहेत त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्तीकरिता ऑनलाईन ॲप्लिकेशन करता येत नाहीत आणि सन २०२२-२३ करिता खूप जास्त ऑनलाईन ॲप्लिकेशनची संख्या महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, संस्था, विद्यापीठाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी.** तसेच पडताळणी प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव/ महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे